International Journal of Applied Research 2019; 5(6): 70-73




**ISSN Print:** 2394-7500
**ISSN Online:** 2394-5869
**Impact Factor:** 5.2
IJAR 2019; 5(6): 70-73
www.allresearchjournal.com
Received: 01-04-2019
Accepted: 05-05-2019

**डॉ. के. बी. गिरासे**
सहयोगी प्राध्यापक,
ग.तु. पाटील महाविद्यालय,
नंदुरबार, महाराष्ट्र भारत

**Correspondence**
**डॉ. के. बी. गिरासे**
सहयोगी प्राध्यापक,
ग.तु. पाटील महाविद्यालय,
नंदुरबार, महाराष्ट्र भारत

# नंदुरबार जिल्हयातील कृषी उत्पादनाचे विश्लेषण

**डॉ. के. बी. गिरासे**

**सारांश :**
नंदुरबार जिल्हा अवर्षणग्रस्त प्रदेशात येत असल्याने जिल्ह्यात अनियमित पाऊस पडतो. असे असले तरी अलीकडील काळात जिल्ह्यात वेगवेगळ्या प्रकारचे कृषी उत्पन्न घेण्याचा शेतकरी प्रयत्न करीत आहेत. या लेखात नंदुरबार जिल्ह्यातील 2005–06 ते 2014–15 या दहा वर्षाचा कालावधीत मुख्य पिकांचे उत्पादन विषयी आढावा घेण्यात प्रयत्न करण्यात आलेला आहे.

**मूल शब्दः** नंदुरबार, असले तरी, अलीकडील

**प्रस्ताविकः**
महाराष्ट्रात सर्व जिल्ह्यामध्ये शेतीसाठी सर्वात कमी जमीन नंदुरबार जिल्ह्यात उपलब्ध आहे. जिल्ह्यातील बराचसा भु–भाग डोंगराळ आणि खडकाळ आहे. जिल्ह्यात आदिवासींची लोकसंख्या जास्त असुन बहुसंख्या शेतकरी हे अल्प भु–धारक आहेत. अक्रानी, अक्कलकुवा, तळोदा आणि शहादा तालुक्यांचा काही प्रदेश सातपुडा पर्वतात येत असल्याने या ठिकाणी कृषी उत्पादनात विविधता दिसते. जिल्ह्यात 40 टक्के जमीन हलक्या प्रतीची व 35 टक्के जमीन मध्यम प्रतीची आहे. जिल्ह्यात अद्यापही पारंपारीक पध्दतीने शेती केली जात असून आधुनिक आदानांचा उपयोग करण्यात येत नाही. बहुसंख्य आदिवासी शेतकरी आपल्या उदर निर्वाहासाठी कृषी उत्पन्न घेताना दिसून येतात. परिणामी जिल्ह्यातील विविध कृषी पदार्थांच्या एकूण उत्पादनावर परिणाम होत आहे. असे असले तरी जिल्ह्यात निरनिराळ्या पिकांचे उत्पादन घेतले जाते.
नंदुरबार जिल्ह्याचे भौगोलिक क्षेत्रफळ 5,034.23 चौरस कि.मी. असून जिल्ह्यातील फार मोठी लोकसंख्या शेतीवर अवलंबुन आहे. नंदुरबार जिल्ह्यातील 16.48 लाख लोकसंख्येपैकी 2.12 लाख शेतकरी आहेत.
अध्ययनावरून 2005–06 ते 2014–15 दरम्यान नंदुरबार जिल्ह्यातील विविध कृषी पदार्थ्यांच्या उत्पादनाच्या बाबतीत असलेले स्थान लक्षात येईल.

**बीजसंज्ञा:**
जिल्ह्यातील मुख्य पिके, पीकनिहाय उत्पादन, पीकनिहाय उत्पादनातील झालेले बदल –

**संशोधन पध्दती:**
सदर पेपर तयार करतांना महाराष्ट्र सरकारचा कृषी विभाग, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, नंदुरबार जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, कृषी खाते, नंदुरबार आणि सरकारी नोंदीचा व संकेत स्थळाचा उपयोग करण्यात येईल. तसेच लेख, वर्तमानपत्रे आणि विषयाशी संबंधित पुस्तकांचाही दुय्यम माहितीसाठी उपयोग करण्यात येईल. त्याचप्रमाणे संशोधक स्वतः आकडेवारीचे वर्गीकरण आणि विश्लेषण करून कोष्टक तयार करेल. संदर्भ वर्ष म्हणून 2005–06 ते 2014–15 या कालावधीचा आधार घेईल. मुख्यत्वेकरून नंदुरबार जिल्ह्यातील मुख्य पिकांचे उत्पादन दहा वर्षात दर वर्षी झालेली वाढ किंवा घट आणि एकूण दहा वर्षात मुख्य पिकांचा कल अशा अनेक संबंधित घटकांवर प्रकाश टाकून त्यांचे वर्गीकरण व विश्लेषण करून मूल्यमापन केले जाईल.

**निष्पत्ती व चर्चा:**
नंदुरबार जिल्हा सातपुडा पर्वतांच्या पायथ्याशी असल्याने कृषी उत्पादनासाठी फार मोठे जमिनीचे क्षेत्रफळ डोंगराळ आहे. त्यामुळे मागील काही वर्षापासुन जिल्ह्यात सपाट प्रदेशात नगदी पिकांच्या उत्पादनाकडे शेतकऱ्यांचा कल दिसून येतो. 2005–06 ते 2014–15 या कालावधीत नंदुरबार जिल्ह्यातील मुख्य पिकांची स्थिती काय प्रतिबिंबीत करते याबाबत सविस्तर माहिती खालील चर्चेतुन स्पष्ट होईल.

**नंदुरबार जिल्ह्यातील मुख्य पिकांचे उत्पादन :**
नंदुरबार जिल्ह्यात 2005–06 ते 2014–15 या दहा वर्षादरम्यान प्रत्येक वर्षी जिल्ह्यात उत्पादन होणाऱ्या मुख्य पिकांचे उत्पादन सारणीमध्ये दर्शवलेले आहे. त्यावरून जिल्ह्यातील मुख्य पिकांचा दहा वर्षातील उत्पादनाचा कल लक्षात येईल.

**सारणी:** नंदुरबार जिल्ह्यातील मुख्य पिकांचे उत्पादन (2005–06 ते 2014–15)

| जिल्हा | 2005-06 | 2006-07 | 2007-08 | 2008-09 | 2009-10 | 2010-11 | 2011-12 | 2012-13 | 2013-14 | 2014-15 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| तांदूळ | 30.9 | 16.9 | 31.2 | 21.9 | 12.9 | 24.7 | 31.7 | 28.4 | 20.3 | 9.0 |
| ज्वारी | 44.6 | 52.6 | 85.2 | 79.9 | 69.9 | 86.0 | 90.5 | 82.2 | 67.2 | 51.5 |
| बाजरी | 10.3 | 8.3 | 21.1 | 21.2 | 12.9 | 24.1 | 15.3 | 16.0 | 5.4 | 3.2 |
| गहू | 24.3 | 31.6 | 38.0 | 19.9 | 49.7 | 54.3 | 48.1 | 50.9 | 45.8 | 39.1 |
| मका | 45.4 | 31.7 | 71.7 | 54.1 | 64.1 | 76.3 | 93.7 | 89.1 | 52.5 | 54.7 |
| कडधान्य | 38.5 | 38.0 | 64.1 | 42.8 | 48.3 | 66.7 | 51.5 | 50.1 | 35.9 | 22.9 |
| तेलबिया | 34.2 | 31.9 | 46.7 | 51.9 | 58.4 | 72.9 | 73.6 | 61.8 | 38.5 | 31.3 |
| ऊस | 356.0 | 915.8 | 1794.2 | 810.2 | 675.4 | 738.5 | 778.7 | 794.0 | 832.6 | 633.8 |
| कापूस | 50.4 | 31.3 | 107.6 | 1076 | 1075 | 1166 | 813 | 96.5 | 149.8 | 101.2 |

**Sourse:** Cropwise, Districtwise area, Production and Productivity, 2005-06 to 2014-15 Department of Agriculture, Government of Maharashtra.

**टिप :**
1) ऊसाचे उत्पादन मे. टनमध्ये
2) कापसाचे उत्पादन 170 किलोग्रॅम गासडी याप्रमाणे.

सरणीमध्ये नंदुरबार जिल्ह्यात सन 2005–06 ते 2014–15 या दहा वर्षाच्या अध्ययन कालावधीत नंदुरबार जिल्ह्यातील मुख्य पिकांचे उत्पादन दर्शविलेले आहे त्यावरून असे निदर्शनास येते की, नंदुरबार जिल्ह्यात 2011–12 यावर्षी 31.7 हजार टन एवढे तांदूळाचे उत्पादन झाले असून दहा वर्षाचे कालावधीत सर्वात जास्त उत्पादन होते. तर 2014–15 यावर्षी जिल्ह्यात तांदुळाच्या उत्पादनात दहा वर्षात सातत्य राहीलेले नाही. प्रत्येक वर्षी कमी जास्त झालेले आहे.

2005–06 यावर्षी जिल्ह्यात 44.6 हजार टन एवढे ज्वारीचे उत्पादन झाले होते. दहा वर्षात त्यात वाढ व घट होत 2014–15 यावर्षी दहा वर्षातील कालखंडात 51.5 हजार टन एवढे ज्वारीचे उत्पादन झाले होते. जिल्ह्यात सर्वात कमी ज्वारीचे उत्पादन 2005–06 यावर्षी तर सर्वात जास्त 2011–12 यावर्षी झाले होते.

महाराष्ट्रात जेथे बाजरी मोठ्या प्रमाणात पिकते तेथील लोकांचा आहारात बाजरीचा समावेश असतो. नाशिक विभागातील नाशिक, जळगांव, धुळे आणि नंदुरबार हे जिल्हे बाजरी उत्पादनात प्रमुख आहेत. नंदुरबार जिल्ह्यात सर्व तालुक्यामध्ये बाजरीचे पिक कमी अधिक प्रमाणात घेतले जाते. नंदुरबार जिल्ह्यात 2005–06 यावर्षी 10.3 हजार टन बाजरीचे उत्पादन झाले होते. बाजरीच्या उत्पादनात दहा वर्षात वाढ व घट होऊन 2014–15 मध्ये फक्त 3.2 हजार टन बाजरीचे उत्पादन झाले होते. यावर्षी दहा वर्षाच्या अध्ययन कालावधीत सर्वात कमी बाजरीचे उत्पादन झाले होते.

गहू हे महाराष्ट्रातील रबी हंगामात घेतले जाणारे पिक आहे. महाराष्ट्रातील बरीच मोठी लोकसंख्येचे गहू हे खाद्य पीक आहे. उत्तर महाराष्ट्रातील तापीच्या खोऱ्यातील जळगांव, धुळे व नंदुरबार जिल्ह्यातही गव्हाचे उत्पादन होते. नंदुरबार जिल्ह्यात 2005–06 यावर्षी 24.3 हजार टन गव्हाचे उत्पादन झाले होते. 2007–08 पर्यंत गहू उत्पादनात जिल्ह्यात जलद वाढ झाली. मात्र 2007–08 च्या तुलनेत (38 हजार टन 2008–09 मध्ये गव्हाचे उत्पादन निम्म्यावर 19.9 हजार टन) आले. ही घट जवळ जवळ 47.63 टक्के होती. यानंतरच्या वर्षात 2009–10 मध्ये जिल्ह्यात दहा वर्षाच्या कालावधीत सर्वात जास्त गव्हाचे उत्पादन 2010–11 यावर्षी झाले होते तर सर्वात कमी उत्पादन 2008–09 मध्ये झाले होते.

महाराष्ट्रात मका हे पिक कोकण, विदर्भ आणि मराठवाड्यातील काही जिल्हे सोडले तर राज्यात इतर सर्वच जिल्ह्यांमध्ये कमी अधिक प्रमाणात मकाचे उत्पादन होते. नंदुरबार जिल्ह्यात गेल्या दहा वर्षात महाचे उत्पादन 2005–06 च्या तुलनेत 2014–15 मध्ये 9.3 हजार टन जास्त होते. जिल्ह्यातील 2005–06 ते 2014–15 या दहा वर्षात मका उत्पादनाचा सरासरी चक्रिय वार्षिक वाढ दर 1.88 टक्के राहीला. नंदुरबार जिल्ह्यात दहा वर्षा दरम्यान 2011–12 या वर्षी मक्याचे सर्वात जास्त उत्पादन झाले तर 2006–07 मध्ये सर्वात कमी उत्पादन झाले होते.

राज्यात विदर्भ आणि मराठवाडा विभागात कडधान्याचे जास्त उत्पादन होते. नाशिक विभागातील नाशिक, जळगांव, धुळे आणि नंदुरबार जिल्ह्यातही कडधान्याचे चांगल्यापैकी उत्पादन घेतले जाते. कडधान्याच्या उत्पादनात जिल्ह्यात सातत्य राहिले नसून प्रत्येक वर्षी त्यात वाढ किंवा घट नोंदविली गेली. 2010–11 या वर्षी जिल्ह्यात (66.7 हजार टन) कडधान्याचे उत्पादन झाले. दहा वर्षात जिल्ह्यातील हे सर्वात जास्त उत्पादन होते. 2014–15 या वर्षी जिल्ह्यात कडधान्याचे सर्वात कमी (22.9 हजार टन) उत्पादन झाले होते.

खानदेशातील जळगांव, धुळे आणि नंदुरबार जिल्ह्यात तेलबियांचे उत्पादन होते. सद्यस्थितीत या जिल्ह्यामध्ये सर्वात जास्त तेलबियांचे उत्पादन नंदुरबार जिल्ह्यात होते. 2011–12 या वर्षी दहा वर्षातील सर्वात जास्त (76.6 हजार टन) तेलबियांचे उत्पादन जिल्ह्यात झाले होते. जिल्ह्यात तेलबियांच्या उत्पादनात दहा वर्षात वाढ व घट झालेली दिसून येते. 2005–06 या जिल्ह्यात 34.2 हजार टन तेलबियांचे उत्पादन झाले होते. 2014–15 मध्ये त्यात 2.9 हजार टन घट होऊन 31.3 हजार टन एवढे तेलबियांचे उत्पादन झाले होते.

उत्तर महाराष्ट्रातील नंदुरबार जिल्ह्यात तापीच्या खोऱ्यात ऊस लागवड केला जातो. जिल्ह्यात तीन साखर कारखाने असल्याने शेतकरी ऊसाचे उत्पादन घेऊ लागला आहे. जिल्ह्यात ऊसाचे उत्पादन घेऊ लागला आहे. जिल्ह्यात ऊसाचे उत्पादन दहा वर्षात स्थिर राहीलेले नाही. दर वर्षी कमी जास्त राहिलेले आहे. 2005–06 यावर्षी जिल्ह्यात 356 हजार टन एवढे ऊसाचे उत्पादन झाले. अध्ययन कालावधीत यानंतरच्या वर्षामध्ये ऊस उत्पादनात वाढ व घट दिसून येते. जिल्ह्यात 2007–08 यावर्षी दह वर्षातील सर्वात जास्त नोंद घेण्यासारखे (1794.2 हजार टन ) ऊसाचे उत्पादन होते. तर सर्वात कमी ऊसाचे उत्पादन 2005–06 या वर्षी झाले होते.

खानदेशात जळगांव, धुळे आणि नंदुरबार जिल्ह्यात कापसाचे उत्पादन घेतले जाते. नंदुरबार जिल्ह्यात तापी नदीच्या खोऱ्यात कापसाची लागवड होते. सुपीक मृदा आणि बेताचा पाऊस यामुळे जिल्ह्यात कापसाचे पीक उत्तम येते. नंदुरबार जिल्ह्यात 2005–06 यावर्षी 50.4 गासडी कापसाचे उत्पादन झाले होते. यानंतर 2006–07 पर्यंत कापसाच्या उत्पादनात वाढ व घट होत राहून 2013–14 यावर्षी 149.8 हजार गासडी उत्पादनाची विक्रमी

नोंद झाली. मात्र 2014–15 यावर्षी परत एकदा उत्पादनात घट होऊन 101.2 हजार गासडी एवढेच कापसाचे उत्पादन झाले होते.

**निष्कर्ष:**

1. महाराष्ट्रातील वाशिम आणि हिंगोली जिल्हा वगळता सर्वात जास्त 82.05 टक्के रोजगार नंदुरबार जिल्ह्यात कृषी क्षेत्रात असल्याने कृषीवर फार मोठा दबाव निर्माण झालेला दिसून येतो. मात्र रोजगार आणि सरासरी रोजगाराशी तुलना करता कृषी क्षेत्रातुन कृषी उत्पादनाची मात्रा फारच अल्प दिसून येते.
2. जिल्ह्यातुन तापी व नर्मदा या दोन नद्या वाहत असून जिल्ह्यात तापी नदीवर प्रकाशा व सारंगखेडा या दोन ठिकाण बॅरेज बांधले असून ते पूर्ण होऊन अनेक वर्ष झाले तरी फक्त पाणी साठा होतो मात्र शेतकऱ्यांना कृषी सिंचनासाठी उपयोग नसल्याने कृषी उत्पादनावर त्याचा प्रतिकुल परिणाम होत आहे.
3. नंदुरबार जिल्ह्यात नंदुरबार तालुक्यातील पश्चिम व दक्षिण प्रदेशात व अक्रानी तालुक्यात तांदुळाचे उत्पादन होते. मात्र 2005–06 ते 2014–15 या दहा वर्षात तांदुळ उत्पादनात सातत्य राहिले नाही. या कालावधी दरम्यान जिल्ह्यात चक्रीय वार्षिक वृध्दी दर वजा 11.6 टक्के राहिला. याचा अर्थ तांदुळ लागवड क्षेत्र जिल्ह्यात कमी झाले असून उपलब्ध पाण्याचा वापर करून सिंचन क्षेत्रात वाढ करून तांदुळ उत्पादनात वाढ होऊ शकते.
4. जिल्ह्यात ज्वारी पिकास अनुकूल वातावरण आहे. 2005–06 ते 2013–14 या कालावधी दरम्यान काही वर्ष वगळता सतत ज्वारी उत्पादनात सतत वाढ नोंदविली गेली. याचा अर्थ जिल्ह्यात ज्वारी लागवडीसाठी अनुकूल जमीन व कमी पावसात येणारे पीक असल्याने शेतकरी ज्वारी लागवडीस प्राधान्य देत असल्याचे सिध्द होते.
5. जिल्ह्यात बाजरी पिकाची लागवड फारशी केली जात नाही असे असले तरी अल्प प्रमाणात बाजरीचे उत्पादन घेण्यात येत आहे. मात्र काही वर्षाचा अपवाद सोडला तर दहा वर्षात बाजरीच्या उत्पादनात सतत घट झालेले आहे. 2005–06 यावर्षी 10.3 हजार टन बाजरीचे उत्पादन होते. दहा वर्षात उत्पादनात घट होऊन 2014–15 यावर्षी फक्त 3.2 हजार टन उत्पन्न झाले. म्हणजेच बाजरी लागवड करण्यास शेतकरी नाखुश आहेत. फक्त आपल्या आहारासाठी पुरेल ऐवढेच बाजरीचे उत्पादन घेतले जाते.
6. सारणीवरून असे दिसून येते की, जिल्ह्यातील तापी नदीच्या सुपिक जमिनीत गव्हाचे उत्पादन चांगल्यापैकी घेण्यात येत आहे. अध्ययन कालावधीत गव्हाच्या उत्पादनात सतत वाढ झालेली आहे. दहा वर्षाच्या कालावधी दरम्यान जिल्ह्यात गव्हाचा चक्रीय वार्षिक वृध्दी दर 4.87 टक्के राहिला आहे.
7. सारणीतील आकडेवारीवरून असे सिध्द होते की, नंदुरबार जिल्ह्यात मका लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते. दहा वर्षाच्या कालावधी दरम्यान मका उत्पादनात नोंदणीय वाढ झालेली आहे. याचाच अर्थ जिल्ह्यातील जमीन मका उत्पादनास अनुकूल आहे. दहा वर्षाच्या कालावधी दरम्यान जिल्ह्यात मक्याचा चक्रीय वार्षिक वृध्दीदर 1.88 टक्के असला तरी 2005–06 ते 2007–08 या दरम्यान 16.45 टक्के 2005–06 ते 2011–12 या दरम्यान 10.91 टक्के राहिला होता.
8. जिल्ह्यात कडधान्याचे उत्पादन नंदुरबार, तळोदा व शहादा या तालुक्यातील प्रदेशात घेण्यात येते. 2006–07 ते 2012–13 या दरम्यान कडधान्याच्या उत्पादनात वाढ दिसून येते मात्र 2013–14 व 2014–15 या दोन वर्षी घट झालेली आहे. शेतकऱ्यांचा मुलाखतीवरून असे निदर्शनास आले की, कडधान्य उत्पादन करणे आर्थिक दृष्ट्या परवडत नाही.
9. तेलबिया उत्पादनात व दर हेक्टरी उत्पादकतेत जिल्हा अग्रेसर होता. मध्यंतरीच्या वर्षामध्ये तेलबियांचे नोंदनीय उत्पादन झाले होते. सिंचनाची समस्या व लहरीपाऊस यामुळे तेलबिया उत्पादनात जिल्ह्यात घट होतांना दिसून येत आहे. त्यावर योग्य उपाय योजण्याची गरज असून शेतकऱ्यांना सिंचनासाठी बॅरेजमधील साठवलेले पाणी लवकरात लवकर उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.
10. तापीच्या खोऱ्यातील सुपीक व गाळाची जमीन असल्याचे ऊसाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात घेतले जाते. 2005–06 ते 2014–15 या कालावधीत ऊस उत्पादनात भरीव वाढ झालेली दिसून येते. या कालावधी दरम्यान जिल्ह्यात ऊसाचा उत्पादनाचा चक्रीय वार्षिक वृध्दीदर 5.94 टक्के राहिला आहे. असे असले तरी 2005–06 ते 2006–07 या एक वर्षा दरम्यान 157.25 टक्के, 2005–06 ते 2007–08 या 124.5 टक्के होता.
11. जिल्ह्यात कापूस पिकविणारा प्रदेश सर्वात जास्त आहे. हे एक नगदी पिक असल्याने बहुसंख्य शेतकरी या पिकास गेल्या काही वर्षापासुन प्राधान्य देतांना दिसून येत आहेत. दहा वर्षा दरम्यान जिल्ह्यात जवळ जवळ कापसाचे उत्पादन दुप्पट झालेले दिसून येते. 2005–06 या वर्षी 50.4 हजार गासडी कापसाचे उत्पादन झाले होते. त्यात वाढ होऊन 2014–15 यावर्षी 101.2 हजार गासडी कापसाचे उत्पादन झाले होते. याचा अर्थ जिल्ह्यात कापूस उत्पादनास पोषक वातावरण असून जिल्ह्यात कापसाशी संबंधित उद्योगांची उभारणी झाली तर शेतकऱ्यांना फार मोठ्या प्रमाणात कापसाचे उत्पादन घेता येईल.

**संदर्भ:**


1. Cropwise, Districtwise Area, Production and Productivity, Department of Agriculture, Government of Maharashtra, 2005-06.
2. Cropwise, Districtwise Area, Production and Productivity, Department of Agriculture, Government of Maharashtra, 2006-07.
3. Cropwise, Districtwise Area, Production and Productivity, Department of Agriculture, Government of Maharashtra, 2007-08.
4. Cropwise, Districtwise Area, Production and Productivity, Department of Agriculture, Government of Maharashtra, 2008-09.
5. Cropwise, Districtwise Area, Production and Productivity, Department of Agriculture, Government of Maharashtra, 2009-10.
6. Cropwise, Districtwise Area, Production and Productivity Department of Agriculture, Government of Maharashtra, 2010-11.
7. Cropwise, Districtwise Area, Production and Productivity, Department of Agriculture, Government of Maharashtra, 2011-12.
8. Cropwise, Districtwise Area, Production and Productivity, Department of Agriculture, Government of Maharashtra, 2012-13.
9. Cropwise, Districtwise Area, Production and Productivity, Department of Agriculture, Government of Maharashtra, 2013-14.
10. Cropwise, Districtwise Area, Production and Productivity, Department of Agriculture, Government of Maharashtra, 2014-15.
11. Kalamkar SS. Agriculture Growth and productivity in Maharashtra: Trends and Determinants, 1st Edition, Allied Publisher Pvt. Ltd. Delhi.

12. Nem Raj Sunda. A Competitive Book of Agriculture, Surahee Publications, Jaipur.
13. नंदुरबार जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, जिल्हा सांख्यकी, कार्यालय, अर्थ व सांख्यकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, 2005–06 ते 2014–15.
14. जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार
15. जिल्हा सांख्यिकी कार्यालय, नंदुरबार विविध विवरण पत्रे